**कृपया प्रसिद्धीसाठी**

# मावळत्या विधानसभेत एका मतदारसंघातून प्रतिवर्षी फक्त सरासरी ४ प्रश्न
## १२ अधिवेशनांत ५९२१ प्रश्न पटलावर; मुंबादेवीचे आमदार अमीन पटेल अव्वल

मुंबई, ता. २७ (बातमीदार) : १४ वी विधानसभा येत्या नोव्हेंबर महिन्यात विसर्जित होणार असून सन २०१९ ते २०२४ या पंचवार्षिक काळात विधिमंडळाची एकूण १२ अधिवेशनं पार पडली. गेल्या विधानसभेच्या तुलनेत कोविडचा परिणाम म्हणून आरोग्यविषयक प्रश्नांत वाढ झाली आहे. यासह महिलांविषयक प्रश्नांत दुपटीने वाढ, तर बालकांवरील प्रश्नांत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. अल्पसंख्य समाजाविषयी मात्र केवळ नऊ प्रश्न गेल्या पाच वर्षात विचारण्यात आले आहेत. या अधिवेशनांत राज्यातील आमदारांनी ५,९२१ प्रश्न सभागृहात मांडले. मुंबादेवी येथील काँग्रेस आमदार अमीन पटेल यांनी सर्वाधिक ६५६ प्रश्न मांडत अव्वल स्थान पटकावले.

मुंबईस्थित 'संपर्क' या धोरणविषयक अभ्यास व पाठपुरावा करणाऱ्या संस्थेने महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजाचे विश्लेषण केले. शुक्रवारी (ता. २७ सप्टेंबर) याबाबतचा अहवाल प्रकाशित करण्यात आला. २०१९ ते २०२४ या काळातील विधीमंडळाच्या १२ अधिवेशनांत १३१ दिवसांच्या कामकाजात उपस्थित केले गेलेले तारांकित प्रश्न व लक्षवेधी सूचना या

माहितीचे विश्लेषण अहवालात करण्यात आले. १४ व्या विधानसभेत कोविडमुळे तीन अधिवेशनं रद्द केली गेली. २०२४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशात प्रश्नोतरांचा तास रहित केला गेला. यामुळे या विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्याची संधी मागील विधानसभेच्या तुलनेत आमदारांना कमी मिळाली.

राज्याच्या धोरणकर्त्या सर्वोच्च वैधानिक संस्थेत, एकूण लोकसंख्येत निम्म्या असलेल्या महिलांच्या संबंधित एकूण ११९ म्हणजेच २.०१ % इतकेच प्रश्न विचारले गेले. विधानसभेत मांडल्या जाणाऱ्या बालकांच्या प्रश्नांचा अभ्यास 'संपर्क' २०१५ पासून करत असून हे प्रमाण नेहमीच दोन ते तीन टक्के राहिले आहे. १४ व्या विधानसभेत तर ते आणखीन घटून २.१८ टक्क्यांवर आले. शालेय शिक्षणविषयक प्रश्न एकूण २५६, म्हणजेच सव्वाचार टक्के आहेत.

मावळत्या विधानसभेत हाताच्या बोटावर मोजता येतील इतके कमी म्हणजे, ९ प्रश्न अल्पसंख्याकांच्या समस्यांविषयी आहेत. हे प्रमाण एकूण प्रश्नसंख्येच्या केवळ ०.१५% आहे. विधानसभेत आज फक्त १० मुस्लिम सदस्य आहेत.

आरोग्यावर एकूण ४५१, म्हणजे सुमारे साडेसात टक्के प्रश्न मांडले गेले. आरोग्यसुविधांविषयी अधिक प्रश्न सर्वच जिल्ह्यांतून विचारले गेले आहेत. अल्प माविनि नांदेड आणि अतिउच्च माविनि मुंबई हे दोन्ही प्रत्येकी दहा

मतदारसंघांचे जिल्हे. पण नांदेडची प्रश्नसंख्या ८.६४% आणि मुंबईची त्याहून कितीतरी अधिक सुमारे २२% आहे.

वांद्रे पश्चिमचे आमदार आशिष शेलार यांनी बालक व आरोग्य विषयासंदर्भातील सर्वाधिक प्रश्न (अनुक्रमे २८ आणि ८२) मांडले. आमदार अमीन पटेल यांनी महिला, शिक्षणविषयक सर्वाधिक प्रश्न (अनुक्रमे २१ आणि ४५) मांडले तर डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी आदिवासीविषयक सर्वाधिक २१ प्रश्न उपस्थित केले.

१४ व्या विधानसभेत संपूर्ण पाच वर्षांच्या काळात विधिमंडळ समित्यांचं कामच झालं नाही. मविआ सरकारने नेमलेल्या समित्या कोविडमध्ये काम करू शकल्या नाहीत. सत्ताबदल झाल्यावर या समित्या रद्द केल्या गेल्या व नव्या नेमल्याच गेल्या नाहीत.

महिला आमदारांच्या कामगिरीचा विचार करता २६ आमदारांपैकी दहिसरच्या आमदार मनिषा चौधरी यांनी सर्वाधिक म्हणजे ४५९ प्रश्न उपस्थित केले. १४ व्या विधानसभेत पहिल्यांदाच आमदार बनलेल्या ९२ आमदारांमध्ये सर्वाधिक ३१६ प्रश्न हे वरोऱ्याच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी विचारले. विधेयकं मंजूर करणं हे विधानसभेचं मुख्य काम. परंतु या १४ व्या विधानसभेत एकाही खासगी विधेयकावर चर्चा झाली नाही. दरम्यान, राज्यात आता विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. जनतेने मताधिकार बजावताना आमदारांच्या सभागृहातील कामगिरीचाही विचार करावा व जनतेच्या प्रश्नांचे अधिकाधिक प्रतिंबिंब सभागृहात उमटावे, या हेतूने संपर्कने हा अहवाल प्रकाशित केला आहे.

**पक्षनिहाय प्रश्नसंख्या –**

- भाजप २८७८
- काँग्रेस १६७०
- शिवसेना १६१७
- राष्ट्रवादी काँग्रेस १३३७
- बहुजन विकास आघाडी १३७
- रासप २३
- सप ३६०
- मनसे ८४
- एमआयएम ६८
- जनसुराज्य शक्ती पक्ष २३
- प्रहार जनशक्ती पक्ष २७
- स्वाभिमानी पक्ष ४९
- कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) २३७
- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष (जुलै २०२३ नंतर) १२६
- शिवसेना (ठाकरे गट जून २०२२ नंतर) १३७

(पक्षनिहाय प्रश्नसंख्या ५,९२१ पेक्षा अधिक आहे कारण काही प्रश्नांची पुनरुक्ती झालेली असते. ५,९२१ हे अनन्य, एकदाच मोजलेले प्रश्न आहेत).

**प्रश्नांचे विवरण –**

- एकूण प्रश्न ५,९२१

- तारांकित प्रश्न ३,७९१
- लक्षवेधी सूचना २,१३०
- आदिवासी १३८
- अल्पसंख्य समाज ९
- आरोग्य ४५१
- शिक्षण २५६
- बालक १२९
- महिला ११९

**या सात आमदारांची कामगिरी सरस –**

- अमीन अमीरअली पटेल ६५६ (सर्वाधिक प्रश्न. शिक्षण आणि महिलाविषयक सर्वाधिक प्रश्न)
- आशिष बाबाजी शेलार ६३० (सर्वाधिक द्वितीय. बालक आणि आरोग्यविषयक सर्वाधिक प्रश्न)
- अस्लम शेख ५३२ (सर्वाधिक तृतीय)
- मनिषा चौधरी ४५९ (महिला आमदारांत सर्वाधिक प्रश्न)
- कुणाल पाटील ३५७ (कमी माविनि असलेल्या जिल्ह्यातून सर्वाधिक प्रश्न)
- प्रतिभा धानोरकर ३१६ (पहिल्यांदा निवडून आलेल्या आमदारांतून सर्वाधिक प्रश्न)
- विनोद निकोले २३७ (आदिवासींबाबत सर्वाधिक २१ प्रश्न)

**मृणालिनी जोग**
प्रकल्पप्रमुख, संपर्क.
फोन : ९८२०५ ०४७८१ / media@sampark.net.in